*भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे मधील कलम १९(०१) खालील अधिसूचना.*

## *अधिसूचना*

भूसंपादन क्रमांक २०१९/मृ.व जसं. विसो/ भुसंशा/१६८०/एसआर-२६/२००३/क्र. २०२०/भूसं./कावि-१८९७/२०२०.--ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांस भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) त्याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये कोणत्याही खातेदाराने आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन यापूर्वीच संपादित केली आहे. त्याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग, मंगळवेढा यांस पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची-एक

### जमिनीचे वर्णन

### पाझर तलाव हातिद (रामोशी लवण) एस.आर. क्रमांक २६/२००३

| गावाचे नाव | तालुका | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | एस.आर. क्रमांक | भूसंपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|
| जुजारपूर | सांगोला | ३९७ | ४-५६ | २६/२००३ | पाझर तलाव हातिद (रामोशी लवण) |

### अनुसूची दोन

**प्रकल्पाचे नाव :** पाझर तलाव हातिद (रामोशी लवण)

**प्रकल्पाचे विवरण :** पाझर तलाव हातिद (रामोशी लवण)

**सामाजिक फायदे** : (सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

### अनुसूची-तीन

### पुनर्वसनविषयक बाबीचे विवरण

### गावाचे नाव : जुजारपूर, तालुका : सांगोला, जिल्हा : सोलापूर

| गट नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|
| ३९७ | ४-५६ |

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे--**

प्रकल्प पूर्ण करताना गट नं. ३९७ हा नकाशातील चुकीमुळे वगळला होता व सध्या परिस्थितीला प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यामुळे बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्याची आवश्यकता नाही.

**टीप-** गट नंबर ३९७ मधील सर्व बाधित शेतकऱ्यांनी पुनर्वसनाची आवश्यकता नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

### अनुसूची चार

### पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

### निरंक

**टिप :** उक्त जमिनीच्या नकाशाचे निरीक्षण उपविभागीय अधिकारी मंगळवेढा विभाग, मंगळवेढा या कार्यालयात करण्यात येईल.

**मिलिंद शंभरकर**

जिल्हाधिकारी सोलापूर.

मंगळवेढा, ६ ऑगस्ट २०२०.